# के. के. वाघ अभियांत्रिकी ब्रह्मास्त्र क्वाड प्रथम

**नाशिक : प्रतिनिधी**

**भोपाळ येथे नुकतीच राष्ट्रीय स्तरावरील आयएसएनई मोटरस्पोर्ट्स या सिझन- १० क्वाड टॉर्क स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ब्रह्मास्त्र क्वाडच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. महाविद्यालयाच्या मेकॅनिकल, रोबोटिक्स, ए.आय.डी.एस. आणि इलेक्ट्रिकल विभागाच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.**

यंदा क्वाड टॉर्क स्पर्धेचे १० वे सिझन पार पडले. या आधी सन २०२२ मध्ये तामिळनाडू येथील मदुराई व सन २०२३ मध्ये मध्य प्रदेश येथील भोपाळ येथे झालेल्या स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले आहे. अर्थात राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा प्रथम पारितोषिक पटकावण्याचा बहुमान प्राप्त झालेला आहे.

या स्पर्धेतील अनेक मापदंड के. के. वाघ अभियांत्रिकी ब्रह्मास्त्र



क्वाडने यशस्वीपणे पूर्ण केले, त्यात प्रामुख्याने किल द हिल, सस्पेन्शन, एक्सीलेरेशन, एन्ड्युरन्स व फ्युएल इकॉनॉमी, मनुव्हेराबिलिटी, डिझाइन, कॉस्ट रिपोर्ट, बिझनेस प्लॅन, सी. ए. इ, व बेस्ट इनोवेशन अवॉर्ड, डिस असेम्ब्ली आणी असेम्ब्ली, मड वॉकर पटकावले. सर्वोत्कृष्ट रायडर हा अवॉर्ड भार्गव पाटीलने जिंकला. स्पर्धेतील १६ पैकी १३ पारितोषिकांवर के. के. वाघच्या ब्रह्मास्त्र क्वाडने बाजी मारली.

टीम ब्रह्मास्त्र क्वाडने वाहन तयार करताना त्याचे स्पेअर भाग जसे की, इंजिन, गिअर बॉक्स, सस्पेन्शन, चासिस, ब्रेक्स, एस्थेटिक, स्टिअरिंग मेकॅनिझमसाठी आवश्यक असलेली यंत्रसामग्रीचा उपयोग महाविद्यालयाच्या वर्कशॉप मध्ये विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केले. गेल्या आठ वर्षांपासून अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी या व अशा विविध स्पर्धांमध्ये भाग घेत असतात.

या स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यासाठी वाहने, अवजारे बनविण्यासाठी संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर, डॉ. पी. बी. कुशारे, डॉ. पी. जे. पवार, डॉ. आर. के. मुंजे, डॉ. एन. बी. गुरुळे, राहुल कार्लेकर, सुरेश कुंभार्डे यांचे सहकार्य लाभले.

या स्पर्धेत सहभागी असलेले विद्यार्थी हरीष सनेर (कॅप्टन), भार्गव पाटील (रायडर), यश पाचपुते, ओमकार पठाडे, समीर सुताने, पार्थ गडाख, आर्या सोमवंशी, विवेक आहेर, आयुष शर्मा, देवेश मंडल, वेदांत जाधव, विराज शेवाळे, वेदांत मापारी, पोर्णिमा होळकर, साक्षी देसले, वेदांत चौधरी, रोशन मेवाड़ा, आदित्य तिवारी, रुद्र चौधरी, हर्षल वाघ, देवेंद्र ठाकरे, साईश हिरवे, प्रणव जाधव, अमेय निकम, अभिनव कडू तसेच महाविद्यालयाचे व ब्रह्मास्त्र क्वाडचे माजी विद्यार्थी सुरभी साबळे, रोशन उगले, सुचित खैरे यांचे मार्गदर्शन लाभले.

यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. समीर बाळासाहेब वाघ, संचालक मंडळ, जनसंपर्क संचालक मा. अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या. स्पर्धेसाठी टीम मेंटॉर म्हणून प्रा. मोहनसिंग परदेशी यांनी कामकाज पाहिले.